**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
महात्मा फुले कृषी विद्यापीठ
राहुरी, जि. अहमदनगर, महाराष्ट्र

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 18-11-2022**

**कोल्हापूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-11-18 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-11-19 | 2022-11-20 | 2022-11-21 | 2022-11-22 | 2022-11-23 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.0 | 30.0 | 31.0 | 32.0 | 32.0 |
| किमान तापमान (अं.से) | 14.0 | 15.0 | 15.0 | 16.0 | 17.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 55 | 59 | 60 | 66 | 73 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 38 | 39 | 40 | 45 | 46 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11.0 | 10.0 | 10.0 | 8.0 | 9.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 68 | 68 | 68 | 72 | 81 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 0 | 2 | 3 | 3 |

## हवामान सारांश / चेतावणी:

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १९ व २० नोव्हेंबर रोजी आकाश स्वच्छ राहण्याची तर दिनांक २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १४.० ते १७.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५५ ते ७३% तर दुपारची सापेक्ष आद्रता ३८ ते ४६% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०८ ते ११ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २३ ते २९ नोव्हेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट ई.च्या अंदाजासाठी “दामिनी” हे अँड्रॉइड मोबईल अॅप डाऊनलोड करावे व त्याचा वापर करावा. रबी हंगामामधील पिकांची पेरणी जमिनीस वाफसा आल्यानंतर करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

रबी पिकांची पेरणी करण्यापूर्वी बियाण्यास शिफारस केलेल्या बुरशीनाशकाची आणि जीवाणू संवर्धन खताची बीजप्रक्रिया करून घ्यावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| गहू | जमिनीमधील ओलाव्याचे प्रमाण पाहून व वापसा आल्यास लवकरात लवकर गहू पिकाची पेरणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | भाताच्या हळव्या जाती पक्व झाल्या असल्यास काढणी करून घ्यावी. भाताच्या लोंब्यामधील ८० ते ९० % दाणे पक्व झाल्याचे दिसताच वैभव विळ्याच्या सहाय्याने पिकाची कापणी जमिनीलगत करावी. यंत्राच्या सहाय्याने कापणी केल्यास वेळेत व खर्चात बचत होऊ शकते. कापलेला भात वळण्यासाठी १ ते २ दिवस पसरून ठेवावा व नंतर मळणी करावी. चांगला उतारा मिळवण्यासाठी मळणीयंत्र वापरावेत. दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के होईपर्यंत भात वाळवावा. नंतर कोरड्या, स्वच्छ व सुरक्षित जागी धान्याची साठवण करावी. |
| अंगठी मिलिट | पक्व नाचणी पिकांची काढणी करून त्वरित मळणी करून घ्यावी आणि तयार शेती माल सुरक्षित शेड मध्ये किंवा ऊन पडलेले असताना उन्हामध्ये वाळवावा व नंतर सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| हरभरा | पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी करावी. |
| ऊस | नोव्हेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.१ मिमी प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस ३.२ लिटर एवढ्या पाण्याची गरज असते त्यामुळे ऊस पिकाची पाण्याची गरज पूर्ण होण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ४८ मिनिटे चालू ठेवावा. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने वांगी भाजीपाला पिकावर फुलकिडे, मावा आणि पांढरी माशी या किडींचा प्रादुर्भाव होऊ शकतो. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फोस्फोमिडॉन ४०% एस.एल.१५ मिली किंवा फेनप्रोपथ्रीन ३०%ई.सी.५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| आंबा | बाष्पीभवनाने जमिनीतील सुमारे ७० टक्के ओलावा नष्ट होतो. यासाठी शेतातील काडी कचरा, धसकटे, गवत, तूरकाड्या, भुसा इत्यादीचे ७ ते ८ सेंटिमीटर जाडीचे आच्छादन करावे त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग मंदावतो. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | थंडीपासून संरक्षणासाठी जनावरांच्या गोठ्यातील तसेच पोल्ट्री शेड मधील तापमान नियंत्रणासाठी गोठयाच्या व पोल्ट्री शेडच्या बाजूने पडदे किंवा गोणपाट लावून तापमान नियंत्रित करावे. |